रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२१/२००६-०८

असा. क्र. ३३

९६०१५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, ऑगस्ट १०, २००७/श्रावण १९, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्ती-वेतन अधिनियम, १९७६, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम | २६३-२६४ |

दिनांक ९ ऑगस्ट २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १० ऑगस्ट २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— (१९७७ चा महा. १.)

१. या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे. (संक्षिप्त नाव.)



[किंमत : ९.०० रुपये]

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (१) मधील "सहा हजार रुपये" या मजकुराऐवजी "आठ हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल, आणि तो दिनांक १ एप्रिल २००७ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. १९७७ चा महा. १.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४अ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मधील,—

(१) "१ जानेवारी २००६" या मजकुराऐवजी "१ एप्रिल २००७" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) "तीन हजार रुपये" या मजकुराऐवजी "चार हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२अ) मधील,—

(१) "१ जानेवारी २००६" या मजकुराऐवजी "१ एप्रिल २००७" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) "तीन हजार रुपये" या मजकुराऐवजी "चार हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२ब) मधील, "१ सप्टेंबर २००० पासून" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "दरमहा तीन हजार रुपये" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी "१ एप्रिल २००७ पासून दरमहा चार हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई